




## माऊली महाविद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**वडाळा :-** श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ वडाळा संचलित माऊली महाविद्यालयाचा २२ वा वर्धापन दिन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा 18 वा वर्धापन दिन तसेच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची 102 वी जयंती व लोकमान्य टिळक यांची 102 वी पुण्यतिथी या विविध कार्यक्रमांचे आयोजन माऊली महाविद्यालयात करण्यात आले होते.

यावेळी प्रा. परमेश्वर हटकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. हटकर यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या विविध साहित्यावरती प्रकाशझोत टाकत त्यांच्या साहित्याचे पैलू उलगडून दाखवले. त्याचबरोबर अण्णाभाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये दिलेले योगदान, अण्णाभाऊ साठे व होमी भाभा यांची भेट, तेथील प्रसंग व साहित्य व विज्ञान यासंदर्भातील अण्णाभाऊंचा दृष्टिकोन यासंदर्भात विस्तृत विवेचन केले. अण्णाभाऊ साठे यांचा मार्क्सवादी दृष्टिकोनासंदर्भात मांडणी केली . अण्णाभाऊ साठे यांनी वर्गव्यवस्थे विरोधात दिलेला लढा त्याचबरोबर शेवटी अण्णाभाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्वीकारलेला वर्णव्यवस्था लढ्याचा मार्ग यासंदर्भात प्रा. परमेश्वर हटकर यांनी मत व्यक्त केले.

प्र. प्राचार्य डॉ. विकास शिंदे यांनी आपल्या भाषणामध्ये लोकमान्य टिळक यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, लोकमान्य टिळकांनी भारतीय राष्ट्रवादाची केलेली मांडणी तसेच अण्णाभाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान, तसेच विद्यापीठ व महाविद्यालय वर्धापन दिनानिमित्त अध्यक्षीय भाषणात विवेचन केले. यावेळी संस्थेचे प्रतिनिधी म्हणून संचालक श्री. हरिभाऊ घाडगे उपस्थित होते, त्यांनी आपल्या मनोगतामध्ये महाविद्यालयाने २२ वर्षांमध्ये गुणवत्तापूर्ण केलेल्या कार्याचा उल्लेख करून यापुढील कालखंडामध्ये महाविद्यालयाचा दर्जा अधिकाधिक उंचावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. जितेंद्र (बाबा) साठे यांनी माऊली महाविद्यालय व विद्यापीठ वर्धापन दिन, अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बाळासाहेब वाघचवरे, सूत्रसंचालन प्रा. प्रमोद पाटील यांनी व शेवटी आभार प्रदर्शन प्रा.डॉ. सौ. प्रतिभा बिरादार यांनी केले. या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.